राज्यातील नागरी नोंदणी पध्दत अधिक बळकट व कार्यक्षम करण्यासाठी कृतीदलाची स्थापना करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९१/कु.क.

गो.ते.रुग्णालय समुह इमारत, १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक: ११, नोव्हेंबर, २०१६

**प्रस्तावना -**

नागरी नोंदणी पध्दत हा शासकिय कामकाजाचा महत्वाचा घटक असून, सदर पध्दत अधिक कार्यक्षम व मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत तसेच सध्या कार्यरत असलेल्या नागरी नोंदणी पध्दतीतील समस्या ओळखून त्यावर उपाय शोधण्यासाठी व नागरी नोंदणी पध्दतीबाबत देशातील विविध राज्यात कार्यरत असलेल्या नागरी नोंदणी पध्दतीतील चांगल्या बाबींचा अंतर्भाव करुन एक विस्तृत आराखडा तयार करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कृतीदलाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

राज्यातील नागरी नोंदणी पध्दत अधिक बळकट व कार्यक्षम करण्यासाठी खालीलप्रमाणे कृती दलाची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग) | सदस्य |
| ३. | अप्पर मुख्य सचिव ( वित्त विभाग) | सदस्य |
| ४. | प्रधानसचिव (सार्वजनिक आरोग्य) | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव (नगर विकास) | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव (सामान्य प्रशासन विभाग) | सदस्य |
| ८. | सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) | सदस्य |
| ९. | सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य |
| १०. | सचिव, (आदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| ११. | महानिरिक्षक, मुद्रांक व विवाह नोंदणी, पुणे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १२. | आयुक्त, एकात्मिक बाल विकास विभाग, मुंबई | सदस्य |
| १३. | अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| १४. | उपमहानिबंधक, नागरी नोंदणी योजना, नवी दिल्ली | सदस्य (तज्ञ) |
| १५. | संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य सचिव |
| १६. | संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई | सदस्य (तज्ञ) |
| १७. | उपसंचालक, आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य पुणे. | सदस्य |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१११११३००४०२२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tulshiram M Shinde

Digitally signed by Tulshiram M Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Tulshiram M Shinde
Date: 2016.11.15 12:03:17 +05'30'

**(तु.मु.शिंदे)**
**कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.महानिरिक्षक, मुद्रांक व विवाह नोंदणी, पुणे.
१२.आयुक्त, एकात्मिक बाल विकास विभाग, मुंबई.
१३.अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
१४.उपमहानिबंधक, नागरी नोंदणी योजना, नवी दिल्ली
१५.संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६.संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई.
१७.उपसंचालक, आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य पुणे.
१८. निवडनस्ती (कु.क.)